RNI No. MAHBIL/2009/35527

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–क

**वर्ष ७, अंक २५]** **शुक्रवार, सप्टेंबर ३, २०२१/भाद्र १२, शके १९४३** **[पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००**

**असाधारण क्रमांक ३१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले**

**(भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ ऑगस्ट, २०२१.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६.**

क्रमांक १३०५५/म.वि.स./ह-१.— महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ (सन १९५६ चा मुंबई अधिनियम ४९) याच्या कलम ८, पोट-कलम (१), खंड (अ) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त समितीने, उक्त कलम ८, पोट-कलम (१) च्या खंड (ड) अन्वये तिला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून व राज्यशासनाशी विचारविनिमय करून तिने तयार केलेले व उक्त कलम ८, पोट-कलम (१), खंड (ई) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे ज्यांना सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी संमती देऊन पुष्टी दिलेली आहे असे पुढील नियम सर्वसाधारण माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहेत :—

**नियम**

**(१) संक्षिप्त नाव व प्रारंभ.**— (१) या नियमांस महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (वाहन चालकांची नेमणूक) नियम, २०२१ असे म्हणता येईल.

(२) हे नियम दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी अंमलात आले असल्याचे मानण्यात येईल.

**(२) व्याख्या.**— (१) संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर, त्या नियमांत,—

(अ) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम (सन १९५६ चा अधिनियम ४९).

(ब) "वाहन चालक" म्हणजे अधिनियमाच्या कलम ६, पोट-कलम (६) अन्वये सदस्याने त्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार त्याच्या कुटुंबातील व्यक्ती व्यतिरिक्त वाहन चालक म्हणून नेमणूक केलेली व्यक्ती.

(२) या नियमांमध्ये अंतर्भूत असलेले परंतु येथे व्याख्या व अभिव्यक्ती न करण्यात आलेले शब्द यांचा अर्थ त्यांना अधिनियमात अनुक्रमे नेमून दिलेल्या अर्थानुसार असेल.

**(३) वाहन चालकाची विनामुल्य सेवा.—** प्रत्येक सदस्यास, अधिनियमातील व या नियमांतील तरतुदींच्या अधिन राहून त्याच्या पदावधीच्या कालावधीत वाहन चालकाची विनामूल्य सेवा मिळण्याचा हक्क असेल.

**(४) नेमणुकीचा किंवा सेवासमाप्तीचा आदेश.—** (१) वाहन चालकाच्या बाबतीत नेमणुकीचा किंवा सेवासमाप्तीचा आदेश हा या नियमास जोडलेल्या नमुना "अ" मध्ये असेल. वाहन चालकाची नेमणूक ही त्याची सेवा अगोदरच समाप्त करण्यात आली नसल्यास सदस्याचा पदावधी एवढ्या मुदतीसाठीच असेल. सदस्य हा, यथास्थिती नेमणुकीच्या किंवा सेवासमाप्तीच्या आदेशाची एक प्रत, ज्या ठिकाणाहून ते आपले वेतन व भत्ते घेत असतील म्हणजेच अवर सचिव तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय आणि त्या वाहन चालकासही पाठवील.

(२) वाहन चालक म्हणून नेमलेली व्यक्ती, ही वैध वाहनचालक अनुज्ञप्ती (लायसन्स) धारण करणारी असेल आणि तिचे वय साठ वर्षे पूर्ण झालेले नसेल आणि या दोन्ही गोष्टी वाहनचालकाची नेमणूक करणाऱ्या सदस्यांकडून प्रमाणित करण्यात येतील.

(३) सदस्याचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी अथवा सदस्याने त्याची सेवा समाप्त करण्यापूर्वी वाहन चालक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचे वय ६० वर्षे पूर्ण झाल्यास, वाहनचालक म्हणून त्या व्यक्तीची सेवा त्याच दिवशी आपोआप संपुष्टात येईल.

**(५) वाहन चालकाचे पारिश्रमिक.—** (१) वाहन चालक हा, सदस्यांकडे जोपर्यंत काम करत असेल, तोपर्यंत त्यास अधिनियमातील खंड (६) च्या उप खंड (६) नुसार राज्य शासनाने वेळोवेळी निगमित केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट केलेले मानधन मिळण्याचा हक्क असेल. त्यास कोणताही प्रवास किंवा दैनिक भत्ता किंवा इतर कोणतेही भत्ते मिळण्याचा हक्क असणार नाही.

**(६) वाहन चालक हा शासकीय कर्मचारी नसणे.—** अधिनियम आणि या नियमान्वये वाहन चालक म्हणून नेमणूक केलेली व्यक्ती ही कोणत्याही कारणासाठी शासकीय कर्मचारी समजण्यात येणार नाही.

**नमुना "अ"**

[नियम ४(१) पहा]

(I)

नियुक्तीचे आदेश

मी, श्री./श्रीमती ........................................................ यांची दिनांक ........................ पासून माझा वाहन चालक म्हणून, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम (सन १९५६ चा ४९) मधील खंड (६) च्या उप खंड (६) आणि महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (वाहन चालकांची नेमणूक) नियम, २०२१ मधील नियम ४ अन्वये नेमणूक करीत आहे.

मी असे प्रमाणित करतो की, या पदासाठी आवश्यक असलेली किमान पात्रता म्हणजे ते/त्या वैध वाहनचालन अनुज्ञप्ती (लायसन्स) धारण करीत असून दिनांक ........................ रोजी त्यांचे वय वर्षे साठ पूर्ण झालेले नाही.

त्यांचा वाहनचालन अनुज्ञप्ती (लायसन्स) क्रमांक .................... असा असून ते दिनांक ............... रोजीपर्यंत वैध आहे.

(वाहनचालन अनुज्ञप्ती (लायसन्स) ची प्रत सोबत जोडली आहे).

(स्वाक्षरी)

महाराष्ट्र विधानसभा सदस्य /

महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य.

ठिकाण :

दिनांक :

प्रत रवाना -

(१) अवर सचिव तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(२) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

(३) वाहनचालक, श्री./श्रीमती ..............................................................

पत्ता : ..............................................................
..............................................................

(II)

**सेवा समाप्तीचे आदेश**

माझे वाहनचालक म्हणून कार्यरत असलेले/असलेल्या श्री./श्रीमती .............................................................. यांची सेवा दिनांक .................... पासून, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम (सन १९५६ चा ४९) मधील खंड (६) च्या उप खंड (६) आणि महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (वाहन चालकांची नेमणूक) नियम, २०२१ मधील ४ अन्वये मी याद्वारे समाप्त करीत आहे.

(स्वाक्षरी)

महाराष्ट्र विधानसभा सदस्य /

महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य.

ठिकाण :

दिनांक :

प्रत रवाना-

(१) अवर सचिव तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(२) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

(३) वाहनचालक, श्री./श्रीमती ..............................................................

पत्ता : ..............................................................

राजेंद्र भागवत,

प्रधान सचिव,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

## MAHARASHTRA LEGISLATURE SECRETARIAT

Vidhan Bhavan, Mumbai 400 032, dated the 25th August 2021.

*NOTIFICATION*

THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBER'S SALARIES AND ALLOWANCES ACT, 1956

No. 13055/MLS/H-1.— The following rules which have been made by the Joint Committee constituted under clause (a) of sub-section *(1)* of section 8 of the Maharashtra Legislature Members' Salaries and Allowances Act (XLIX of 1956), in exercise of the powers confered by clause (d) of sub-section *(1)* of the said section 8, in consultation with the State Government and approved and confirmed by the Chairman of the Maharashtra Legislative Council and the Deputy Speaker of the Maharashtra Legislative Assembly, as required under clause (e) of sub-section *(1)* of the said section 8, are hereby published for general information :—

### RULES

1. **Short title and commencement.**— *(1)* These rules may be called the Maharashtra Legislature Members' (Appointment of Driver) Rules, 2021.

(2) These rules shall be deemed to have come into force on the lst day of January 2021.

2. **Definitions.**— (1) In these rules, unless the context otherwise requires,—

*(a)* "Act" means the Maharashtra Legislature Members' Salaries and Allowances Act (XLIX of 1956);

*(b)* "Driver" means a person not being a member of the family of the Member who is appointed by the Member at his discretion as a driver under sub-section *(6)* of section 6 of the Act.

(2) The words and expressions used in these rules but not defined herein shall have the same meaning as respectively assigned to them under the Act.

3. **Free service of Driver.**— Every Member shall subject to the provisions of the Act and these rules be entitled free of charge to the services of a driver throughout his term of office.

4. **Appointment or termination order.**— (1) The appointment or termination order in respect of a driver shall be in Form 'A' appended to these rules. The appointment of driver, unless, terminated earlier shall be co-terminus with the term of office of the Member. The member shall forward a copy of the appointment order or the termination order to the Under Secretary *cum* Drawing and Disbursing Officer, from where the Member draws his salary and allowances, the Principal Secretary, Maharashtra Legislature Secretariat and the Driver.

(2) The person appointed as driver shall hold valid driver's license and should not have completed sixty years of age and both these shall be certified by the Member appointing the driver.

(3) If the person appointed as driver completes 60 years of his age before the completion of the term of office of the Member or is terminated by the Member during his term of office, the services of the driver shall automatically be terminated the same day.

5. **Remuneration of Driver.**— (1) The Driver shall be entitled to such a remuneration as may be specified by order issued by the State Government, from time to time, under sub-section 6 of section 6 of the Act as long as he is working with the Member He shall not be entitled to any travelling or daily allowance or any other allowances.

6. **Driver not a Government Servant.**— A person appointed as driver under the Act and these rules shall not be treated as a Government Servant for any purpose.

FORM-'A'

[*See* rule 4(1)]

(I)

I appoint Shri/Smt. ................................................ as my driver with effect from................................. under sub-section (6) of section 6 of the Maharashtra Legislature Members' Act (XLIX of 1956) and rule 4 of the Maharashtra Legislature Members' (Appointment of Driver) Rules, 2021.

* I Certify that he/she possesses the minimum qualification *viz.* he holds a valid drivers license and has not completed sixty years of age as on Date ...............................

His/Her license number is ............................... and it is valid till .................

(A copy of the license is attached herewith)

(Signature)

Member of Legislative Assembly/

Member of Legislative Council

Place ..........................

Date ............................

Copy to—

1. Under Secretary *cum* Drawing and Disbursing Officer, Maharashtra Legislature Secretariat.

2. The Principal Secretary, Maharashtra Legislature Secretariat, Vidhan Bhavan, Mumbai 400 032.

3. Driver, Shri/Smt. ...................................................

Address : ...........................................................

...........................................................

(II)

(Termination Order)

I hereby terminate with effect from ............................................................ the services of Shri/Smt. ......................................... who was working as my driver under sub-section *(6)* of section 6 of the Maharashtra Legislature Members' Act (XLIX of 1956) and rule 4 of the Maharashtra Legislature Member's (Appointment of Driver) Rules, 2021.

(Signature)

Member of Legislative Assembly/

Member of Legislative Council

Place ........................

Date ............................

Copy to—

1. Under Secretary *cum* Drawing and Disbursing Officer, Maharashtra Legislature Secretariat.

2. The Principal Secretary, Maharashtra Legislature Secretariat, Vidhan Bhavan, Mumbai 400 032.

3. Driver, Shri/Smt. .......................................................

Address : ............................................................

............................................................

RAJENDRA BHAGWAT,

Principal Secretary,

Maharashtra Legislature Secretariat.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.